सन २०२२-२३ ते २०२५-२६ या वर्षात प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component अंतर्गत रु.३५०.०० कोटी निधीचा कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प राबविण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- कृवपदुम-१९०४५/७/२०२६-MAG-८A (E-१५७१२२२)**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**
**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२६**

**संदर्भ :**

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.कृयांयो-१०२२/प्र.क्र.१९३/८-अे, दि.१५ नोव्हेंबर २०२२.

२) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.RKVY/T-०३/PK २२/२०२५-२६/R-२१/२०२६, दि.२२ जानेवारी, २०२६.

३) राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.फा.सं.१-१५/२०२५-RKVY, दि.२३ फेब्रुवारी, २०२६.

४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृ.यां.प्र./गुनि-५/नक्र.२१७/१४७(र)/२०२५-२६, दि.२३ फेब्रुवारी, २०२६.

**प्रस्तावना :-**

शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी तसेच कृषी क्षेत्रामध्ये ऊर्जा वापर वाढविण्यासाठी केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप अभियान तसेच, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना राज्यात राबविण्यात येत आहे. याशिवाय विविध केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत जसे, राष्ट्रीय गळीतधान्य, तेलबिया व तेलताड अभियान, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान व राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत सुद्धा कृषी यांत्रिकीकरण घटकासाठी काही प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. असे असले तरी शेतकऱ्यांच्या मागणीच्या प्रमाणात यांत्रिकीकरणासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. या बाबी विचारात घेऊन प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component मधून सुद्धा कृषी यांत्रिकीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दि.२२ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या राज्य स्तरीय मान्यता समितीच्या (SLSC) बैठकीत, कृषी यांत्रिकीकरण प्रकल्पास रु.२९१.३७ कोटी रकमेच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली होती. यामध्ये RKVY-RAFTAR अंतर्गत रु.१५०.०० कोटी व लाभार्थी हिस्सा रु.१४१.३७ कोटी निधीचा समावेश होता. त्यानुसार संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सन २०२२-२३ या वर्षात RKVY-RAFTAR अंतर्गत रु.१५०.०० कोटी निधीचा कृषि यांत्रिकीकरण प्रकल्प राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ४१ वी राज्य स्तरीय मान्यता समितीची (SLSC) बैठक पार पडली. त्यामध्ये प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component मधून कृषी यांत्रिकीकरणासाठी सन २०२२-२३ ते २०२५-२६ करिता सुधारित रक्कम रु.७०८.०७ कोटीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component अंतर्गत रु.३५०.०० कोटी (यापूर्वीचे रु.१५०.०० कोटी व अतिरिक्त रु.२००.०० कोटी) व लाभार्थी हिस्सा रु.३५८.०७ कोटी इतक्या निधीचा समावेश आहे. त्यास अनुसरुन कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये केंद्र शासनास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला होता. केंद्र शासनाने संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component अंतर्गत रु.३५०.०० कोटी निधीचा कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component अंतर्गत रु.३५०.०० कोटी निधीचा कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प राबविण्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. सन २०२२-२३ ते २०२५-२६ या वर्षात प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component अंतर्गत रु.३५०.०० कोटी (अक्षरी रुपये तीनशे पन्नास कोटी फक्त) निधीचा कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प राबविण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व खालील अटींस अधीन राहून करण्यात यावी :-

(१) प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component अंतर्गत मंजूर प्रकल्पामधून केवळ कृषी यंत्र व औजारांच्या खरेदी करीता अनुदान देण्यात यावे.

(२) या निधीतून ट्रॅक्टर खरेदीसाठी अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

(३) सदर प्रकल्पाची अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलवर करण्यात यावी.

(४) लाभार्थ्यांकडून अर्ज महाडीबीटी पोर्टलवर स्विकारुन प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

(५) प्रकल्पांतर्गत देण्यात येणाऱ्या यंत्र/अवजारांचे Geo tagging करावे तसेच केंद्र शासनाच्या krushi mapper या ॲपवर नोंदणी करण्यात यावी.

(६) अनुदानाची रक्कम महाडीबीटी पोर्टलवरून डीबीटीद्वारे SNA Sparsh प्रणालीद्वारे अदा करण्यात येत असल्याची खात्री आयुक्त (कृषी) यांचेकडून करण्यात यावी.

(७) लाभधारकाचा आधार क्रमांक अभिलेख्यामध्ये नमूद करण्यात यावा.

(८) लाभधारकाचे स्थान (location) नमूद करण्यात यावे.

(९) प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PM-RKVY)-DPR Based component मधून कृषी यांत्रिकीकरण प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीमधून क्षेत्रीय स्तरावर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती आयुक्त (कृषी) यांचेकडून विहित करण्यात येऊन सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२२७१८१८१८९३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.02.27 18:19:06 +05'30'

**( भुपेश अ.कोळी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.
३. सर्व सन्माननीय विधी मंडळ सदस्य, द्वारा विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व संचालक/सह संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
१०.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
११.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
१२.माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१३.वित्त विभाग (व्यय-१ व अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई-३२.
१४.नियोजन विभाग (का.१४३१), मंत्रालय, मुंबई-३२.
१५.निवडनस्ती (कार्यासन-८अे).